# शिक्षण विभाग प्राथ जिल्हा परिषद वाशिम

परिशिष्ट (नमुना २)

९०७०६
जाक्र/शिवि/खाप्राशा/RTE मान्यता / /२०२६
कार्यालय शिक्षण विभाग (प्राथ)जि.प.वाशिम
दिनांक २८/ ०४ / २०२६

प्रति,
व्यवस्थापक
रामा इंटरनॅशनल स्कुल वाशिम

विषय :- बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २००९ च्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम ११ पोटनियम (४)अन्वये शाळांना आर.टी.ई.मान्यता प्रमाणपत्र देणे बाबत.
संदर्भ :- ग.शि.अ. पंचायत समिती वाशिम यांचा अहवाल जाक्र /३१०दि.२७/०२/२०२६(कार्यालयास प्राप्त दि.९.०३.२०२६)

महोदय,

आपल्या दिनांक ०९/०३/२०२६ च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलेल्या पत्राव्यवहार शाळेची केलेली तपासणी या आधारे मी शिक्षणाधिकारी प्राथमिक जिल्हा परिषद वाशिम ०१.०४.२०२५ ते ३१.०३.२०२८ या कालावधीसाठी इयत्ता ०१ ते ०७ करीता रामा इंटरनॅशनल स्कुल वाशिम या शाळेसआर.टी.ई.मान्यता देत आहे.

वरिल मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या अधिन आहे.

१) ही मान्यता पुढे वाढणार नाही .
२) शाळा बालकांचा मोफत आधिसक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ (सहपत्र १) बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ (सहपत्र २) च्या तरतुदींशी बांधील राहील.
३) शाळा इयत्ता १ ली मध्ये मान्य विद्यार्थी संख्येच्या किमान २५ टक्के शेजारच्या परिसरातील दुर्बल घटकातील आणि प्रतिकुल गटात बालकांना प्रवेश देईल आणि त्यांचे प्राथमिक शिक्षण पुर्ण होई पर्यत त्यांना मोफत शिक्षण देईल .हाच निकश पुर्व प्राथमिक वर्गात प्रवेश देतांना पाळला जाईल.
४) परिच्छेद ३ मध्ये नमुद बालकांच्या खर्च कलम १२(२)प्रमाणे प्रतिपुर्तता केली जाईल.अशा प्रतिपुर्तीसाठी शाळा स्वतंत्र बँक खाते उघडेल .
५) शाळा प्रवेशासाठी कोणत्याही प्रकारची फीस कॅपिटेशन फी आकारणार नाही.आणि बालक अथवा पालकांना छाननी प्रक्रीयेची सक्ती करणार नाही.
६) कोणत्याही बालकास वयाचा दाखला नाही म्हणुन शाळा प्रवेश नाकारणार नाही.अथवा लिंग,धर्म ,जात जन्म ठिकाण या कारणांवर प्रवेश नाकारणार नाही.
७) शाळा पुढील बार्बीची दक्षता घेईल.

एक) कोणतेही बालक कोणत्याही वर्गात प्रचलित कायदे व शासन निर्णयानुसार नापास/थोपविले जाणार नाही अथवा त्याचे प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत शाळेबाहेर हाकलले जाणार नाही.
दोन) कोणत्याही बालकास शारीरीक शिक्षा होणार नाही वा मानसिक छळ केला जाणार नाही.
तीन) प्राथमिक शिक्षण पुर्ण करणा-या प्रत्येक बालकांस सार्वजनिक बाहय परिक्षेस उत्तीर्ण होण्याची अट असणार नाही.
चार) प्राथमिक शिक्षण पुर्ण करणा-या प्रत्येक बालकांस नियम २३ खाली विहीत केलेले प्रमाणपत्र दिले जाईल.
पाच) अधिनियमांच्या तरतुर्दीनुसार अपंग /विशेष गरजा असणारे बालंकाचा समावेश केला जाईल.
सहा)अधिनियमांच्या कलम २३ (१)मध्ये विहीत केल्यानुसारच किमान शैक्षणिक अर्हता असलेल्या शिक्षकांचीच नेमणुक केली जाईल.पुढे असे की ज्या शिक्षकांनी या अधिनियमांच्या अंमलबजावणी तारखेस जर किमान अर्हता प्राप्त केलेली नसेल तर ५ वर्षांच्या कालावधीत ते विहीत किमान अर्हता संपादन करतील.
सात) शिक्षक कलम २४(१) नुसार विहीत कर्तव्ये पार पाडतील.
आठ) शिक्षक खाजगी शिकवण्या घेणार नाहीत.

८) उचित प्राधिकरणाने विहीत केलेला अभ्यासक्रम अंमलात आणेल.
९) कलम १९ मध्ये विहीत केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध सोयीच्या प्रमाणात विदयार्थ्यांना प्रवेश दिला जाईल.
१०) शाळा कलम १९ मध्ये विहीत सर्व निकष मानके याप्रमाणे सर्व बाबींचा दर्जा ठेवेल.मागील तपासणी अहवालानुसार शाळेत उपलब्ध सोयीचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| १ | शाळा परिसराचे क्षेत्रफळ | २०२३४ चौ.मि. |
| २ | एकुण बांधकाम | ४६४.५१ चौ.मि. |
| ३ | क्रिडांगणाचे क्षेत्रफळ | १६०० चौ.मि . |
| ४ | वर्ग खोल्या संख्या | ७ |
| ५ | मुख्याध्यापक/कार्यालय स्टोअरसाठी खोली | आहे |
| ६ | मुले व मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह | आहे |
| ७ | पिण्याच्या पाण्याची सोय | आहे |
| ८ | मध्यान्ह भोजन शिजवण्यासाठी स्वयंपाकघर | लागु नाही |
| ९ | अडथळाविना प्रवेश वावर/सुविधा (RAMP) | आहे |
| १० | अध्ययन अध्यापन साहित्य क्रिडासाहित्य वाचन साहित्य | आहे |
| ११ | विद्युतीकरण | आहे |
| १२ | संरक्षकभिंत/तारेचे कुंपण | आहे |

११) मान्यता नसलेले वर्ग तुकडया शाळेत अथवा शाळेच्या नावाखाली परिसराबाहेर चालविले जाणार नाहीत.

१२) शाळा इमारत व इतर बांधकामे केवळ बालकांच्या शिक्षण/कौशल्य विकास या करीताच वापरात राहील.

१३) शाळेचे संचालन सोसायटी रजिस्ट्रेशन ऍक्ट(१८६०चा२१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० नुसार केलेले असेल.

१४) शाळा कोणा एका व्यक्तिच्या,गटाच्या किंवा व्यक्तीसमुहाच्या किंवा अन्य फायदयाकरीता चालविली जाणार नाही.

१५) शाळेचे लेखेसनदी लेखापालाकडुन तपासले जातील.लेखापरिक्षण केले जातील आणि नियमानुसार योग्य असे लेखातक्ते तयार केले जातील त्यांची एक प्रत जिल्हा शिक्षणाधिका:याकडे दरवर्षी पाठवावी लागेल.

१६) शाळेला २७०६०६१२५०६ हा UDISE क्रमांक दिला आहे.त्याची नोंद घ्यावी व पुढील पत्रव्यवहारात त्याचा वापर न चुकता करावा.

१७) शाळा या अधिनियमाची उत्तरदायित्व पुर्ण करण्यासाठी आणि सतत मान्यतेच्या अटी पुर्ण करण्याच्या दृष्टीने आवश्यक अहवाल माहिती शिक्षण संचालक जिल्हा शिक्षणाधिकारी यांनी मागितल्यानुसार पुरविली आणि राज्य सरकार स्थानिक प्राधिकरण यांच्या आदेशाचे पुर्ण पालन करील.

१८) शाळेच्या संचालकासंदर्भात सोसायटीज रजिस्ट्रेशन अॅक्ट १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था नोंदणी नियम १९५० अंतर्गत नुतनिकरण केल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

१९) इतर अटी परिशिष्ट नमुना (३) प्रमाणे सोबत जोडले आहे.

२०) शिक्षण विभाग महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णयाची अंमलबजावणी करावी लागेल.तसेच विभागाने मागीतलेली माहीती वेळोवेळी पुरवावी लागेल.

२१) बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम २०११ मधील तरतुदीच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आले आहे.व यापुढे विहीत करण्यात येणारे अधिसुचना शासन निर्णय शासन परिपत्रक इ.पालन करणे बंधनकारक राहील.

२२) संबधित शिक्षण संस्थाच्या खेळासाठीचे मैदान संबधित स्थानीक स्वराज्य संस्था सोबत (जि.प/न.प) सामंजस्य करार करणे बंधनकारक राहील.

२३) शैक्षणिकशुल्क हे महाराष्ट्र यरैक्षणिक संस्था अधिनियम २०११ नुसार विद्यार्थ्याचे शैक्षणिकशुल्क निर्धारणाबाबत कार्यवाही करणे आवश्यक राहील.

२४) सदर शाळेबाबत किंवा संबधित संस्थेबाबत गंभीर स्वरुपाची तक्रार अथवा आर्थीक अनियमीयतेतच्या गंभीर स्वरुपात तक्रारी नसाव्यात.

२५) शाळेचा मालकीबाबत ७/१२.८अ किंवा नोंदनिकृत भाडेपट्टा ई.कादपत्र एक वर्षाच्या आत सादर करण्यात यावे.

२६) संस्था शाळेच्या नावे ३.०० लक्ष सुरक्षाठेव रक्कम मुदत ठेव पावतीची साक्षांकीत प्रत सादर करावी.

२७) मुख्याध्यापक व गटशिक्षणाधिकारी यांनी सादर केलेली माहीती चुकीची आढळल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता प्रस्तुत आदेश रद्द करण्यात येईल व चुकीची माहीती सादर करणाऱ्या संबंधीतावर कारवाई करण्यात येईल.

(संजय ससाणे)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद वाशिम

प्रतिलीपी :- गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती वाशिम यांना माहीती करीता रवाना.

(संजय ससाणे)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद वाशिम

Scanned with CamScanner